15-09-2024-Dai-08_Layout 1 9/14/2024 11:50 PM Page 1



# भारतीय हॉकी संघ उपांत्य फेरीत

## पाकचा २-१ ने धुव्वा : आशियाई हॉकी चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धा

**हुलुनबुर, दि. १४ :**

आशियाई हॉकी चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धेत भारतीय हॉकी संघाने पाकिस्तानचा २-१ असा धुव्वा उडवला. भारतासाठी हरमनप्रीत सिंगने दोन गोल केले, तर नदीम अहमदने पाकिस्तानसाठी सामन्यात पहिला गोल केला. भारताने या स्पर्धेत सलग पाचवा सामना जिंकला आहे. पाकिस्तानवरील या विजयासह भारताने आशियाई चॅम्पियन्स ट्रॉफीच्या सेमीफायनलमध्ये धडक मारली. पॅरिस ऑलिम्पिक कांस्यपदक विजेत्या भारताने याआधी चीनचा ३-०, जपानचा ५-१, मलेशियाचा ८-१ तर कोरियाचा ३-१ असा पराभव केला आहे.





या विजयासह भारतीय संघ या स्पर्धेत आतापर्यंत अपराजित राहिला आहे. तर पाकिस्तान संघाचा हा पहिलाच पराभव आहे. गुणतालिकेत भारत पहिल्या स्थानावर आहे, तर पाकिस्तान संघ दुसऱ्या स्थानावर आहे. भारत आणि पाकिस्तान हे दोन्ही संघ यापूर्वीच उपांत्य फेरीसाठी पात्र ठरले आहेत.

चीनमधील हुलुनबीर येथे हॉकी आशियाई चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये भारत विरुद्ध पाकिस्तान संघ शनिवारी एकमेकांशी भिडले. या सामन्यातील पहिला गोल पाकिस्तानच्या नदीम अहमदने ८ व्या मिनिटाला केला. या स्पर्धेत भारताने प्रथमच एक गोल राखून सामन्याची सुरुवात केली. याआधी टीम इंडियाने गेल्या चार सामन्यांमध्ये पहिला गोल केला होता. मात्र, पहिल्या क्वार्टरअखेर भारताने पेनल्टी कॉर्नरच्या मदतीने बरोबरी साधत हरमनप्रीत सिंगने भारताचे खाते उघडले. दुसऱ्या क्वार्टरच्या चौथ्या मिनिटाला हरमनप्रीतने दुसरा गोल करून भारताला २-१ अशी आघाडी मिळवून दिली. दुसऱ्या क्वार्टरच्या अखेरपर्यंत पाकिस्तानने गोल करण्याचा प्रयत्न केला, पण भारताच्या बचावफळीमुळे त्यांना अपयश आले. त्यामुळे ३० मिनिटांअखेर भारताने २-१ अशी आपली आघाडी कायम राखली.

तिसऱ्या क्वार्टरच्या सुरुवातीपासूनच दोन्ही संघांनी गोल करण्याचा प्रयत्न केला. मात्र यश मिळू शकले नाही. अनेक पेनल्टी कॉर्नर घेऊनही दोन्ही संघांना एकही गोल करता आला नाही. वाहिद अश्रफ राणाला पिवळे कार्ड मिळाल्याने तो १० मिनिटे बाहेर गेला. त्यामुळे सामन्याच्या शेवटच्या १० मिनिटांत पाकिस्तानचा संघ केवळ १० खेळाडूंसह खेळला. सामन्यावर अखेरपर्यंत भारतीय संघाने वर्चस्व कायम राखत पाकिस्तानचा २-१ असा पराभव केला.

भारताने पाकिस्तानचा पराभव करत स्पर्धेत सलग पाचवा विजय नोंदवला आहे. या स्पर्धेचे तीनवेळा विजेतेपद पटकावणाऱ्या भारतीय संघाने स्पर्धेतील पहिल्या सामन्यात चीनचा ३-१, जपानचा ५-१ आणि मलेशियाचा ८-१ असा पराभव केला होता. तर, संघाने दक्षिण कोरियाविरुद्ध २-२ अशी बरोबरी साधली आहे.

पाकिस्तान संघानेही या स्पर्धेत आतापर्यंत चमकदार कामगिरी केली होती. या संघाने आतापर्यंत एकूण ४ सामने खेळले असून त्यात २ सामने जिंकले आहेत. तर संघाने २ सामने अनिर्णित राहिले होते. पाकिस्तानने मलेशिया आणि दक्षिण कोरियाविरुद्ध २-२ अशी बरोबरी साधली, तर संघाने जपानचा २-१ आणि चीनचा ५-१ अशा फरकाने पराभव केला.



# भारतीय गोलंदाज इतरांपेक्षा वेगळे

**चेन्नई, दि. १४ :**

भारतीय संघ घरच्या मैदानावर (१९ सप्टेंबर) पासून बांगलादेशसोबत २ सामन्यांची कसोटी मालिका खेळणार आहे. त्यासाठी भारतीय संघ सध्या गौतम गंभीर आणि नवा गोलंदाजी प्रशिक्षक मॉर्ने मॉर्केलच्या मार्गदर्शनाखाली सराव करत आहे. दोन्ही संघांमधील पहिला कसोटी सामना चेन्नईच्या चेपॉक स्टेडियमवर रंगणार आहे. तत्पूर्वी भारताच्या नव्या गोलंदाजी प्रशिक्षकाने भारतीय गोलंदाजांबद्दल प्रतिक्रिया दिली आहे.

बीसीसीआयने पोस्ट केलेल्या

### गोलंदाजी प्रशिक्षक मॉर्ने मॉर्केल

व्हिडिओमध्ये मार्ने मॉर्केल म्हणाला, खेळाडू, त्यांची ताकद, त्यांची कमकुवतता समजून घेऊन आगामी मालिकेसाठी लक्ष्य निश्चित करणे हा आजचा उद्देश होता. खेळाडूंनी खरोखरच चांगली कामगिरी केली. ते किती मजबूत होते ते कसे काम करतात, हे पाहून मला आश्चर्य वाटले. त्यामुळे हे एक चांगले लक्षण आहे आणि आशा आहे की आम्ही त्यावर अधिक काम करू शिकू.

पुढे बोलताना मॉर्ने मॉर्केल म्हणाला, खेळाडूंकडे प्रतिभा आणि कौशल्य असणे ही एक गोष्ट आहे, परंतु सर्वप्रथम आपण खेळाडूंना आव्हानात्मक वातावरणात दाखवून त्यांचा आत्मविश्वास वाढवला पाहिजे, कारण भारताकडून खेळताना आणि निळी जर्सी परिधान करताना त्यांच्याकडून खूप अपेक्षा असतात. दोन्ही संघातील पहिला कसोटी सामना (२३ सप्टेंबर) पासून चेन्नईत आणि दुसरा कसोटी सामना (२७ सप्टेंबर) पासून कानपूरमध्ये खेळवला जाणार आहे. भारत आणि बांगलादेश यांच्यातील दोन्ही सामने चालू असलेल्या जागतिक कसोटी चॅम्पियनशिप सायकलचा भाग आहेत.

# केनिया संघाच्या मुख्य प्रशिक्षकपदावरून डोडा गणेश यांची हकालपट्टी

**नवी दिल्ली, दि. १४ :**

भारताचे माजी क्रिकेटपटू आणि कर्नाटकचे माजी वेगवान गोलंदाज डोडा गणेश यांची केनिया संघाच्या मुख्य प्रशिक्षकपदावरून हकालपट्टी करण्यात आली आहे. त्यांना अवघ्या महिन्याभरापूर्वीच संघाचे मुख्य प्रशिक्षक बनवण्यात आले होते. मात्र आता त्यांना पदावरून हटवण्यात आले आहे. त्यांचा करार एक वर्षासाठी होता, परंतु नेशन आफ्रिकेच्या अहवालानुसार डोडा गणेश यांची नियुक्ती योग्य पद्धतीने झाली नव्हती. त्यात अनियमितता होती. याच कारणांमुळे त्यांना आता मुख्य प्रशिक्षकपदावरून हटवण्यात आले आहे.



क्रिकेट केनियाने एक पत्र देऊन दोडा गणेश यांना प्रशिक्षकपदावरून हटवले. या पत्रात लिहिले आहे की, क्रिकेट केनियाच्या कार्यकारी मंडळाने बुधवार २८ ऑगस्ट २०२४ रोजी एक ठराव पारित केला. या अंतर्गत, आम्ही तुम्हाला सांगू इच्छितो की कार्यकारी मंडळानं तुमची मुख्य प्रशिक्षक म्हणून नियुक्ती नाकारली आहे. तुम्ही आणि मनोज पटेल यांच्यात ७ ऑगस्ट २०२४ रोजी झालेला करार अवैध होता. या करारानुसार क्रिकेट केनिया आता जबाबदार नाही. त्यामुळे तुम्हाला राष्ट्रीय संघाशी संपर्क साधणे किंवा त्यांच्याशी व्यवहार करणे तात्काळ बंद करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

डोडा गणेश यांचा करार रद्द झाल्यानंतर आता केनिया संघात दोन प्रशिक्षकांची नियुक्ती करण्यात आली. माजी आंतरराष्ट्रीय खेळाडू लॅमेक ओन्यांगो आणि जोसेफ अंगारा यांची मुख्य प्रशिक्षक आणि सहाय्यक प्रशिक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. या दोघांची पहिली जबाबदारी केनिया संघाला आयसीसी डिव्हिजन २ चॅलेंज लीगसाठी तयार करणं असेल. केनिया येथे सप्टेंबरमध्ये होणाऱ्या या लीगमध्ये पापुआ न्यू गिनी, कतार, डेन्मार्क आणि जर्सी हे संघ सहभागी होतील. यानंतर २०२६ आयसीसी टी२० विश्वचषक आफ्रिका उप-प्रादेशिक पात्रता बी स्पर्धा खेळली जाईल. केनियाशिवाय झिम्बाब्वे, रवांडा, मोझांबिक, चिली आणि झांबिया हे देश या स्पर्धेत खेळणार आहेत. ही स्पर्धा १७ ऑक्टोबर ते २६ ऑक्टोबर दरम्यान आयोजित करण्यात येणार आहे. डोडा गणेश यांची आंतरराष्ट्रीय कारकीर्द फारशी चांगली नव्हती. ते भारतासाठी फक्त ४ कसोटी आणि एक वनडे सामना खेळले. मात्र, देशांतर्गत क्रिकेटमध्ये त्यांची आकडेवारी उत्कृष्ट होती.

# इंग्लंडचे कमबॅक, ऑस्ट्रेलियावर मात

**कार्डिफ, दि. १४ :**

इंग्लंड आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात सुरू असलेल्या टी- ट्वेंटी मालिकेतील दुसऱ्या टी-२० सामन्यात इंग्लंडने दमदार पुनरागमन करत ऑस्ट्रेलियाचा संघाचा ३ गड्यांनी पराभव केला. पहिला टी-२० सामना जिंकलेल्या ऑस्ट्रेलियाला दुसऱ्या सामन्यात इंग्लंडने चांगलाच धक्का दिला. पण तरीही ऑस्ट्रेलियाच्या खेळाडूने इतिहास घडवत मोठी कामगिरी आपल्या नावे केली आहे.

ऑस्ट्रेलिया संघाने हा सामना गमावला असला तरी सलामीवीर मॅथ्यू शॉर्टने गोलंदाजीत नवा विक्रम रचला. मॅथ्यू शॉर्ट ऑस्ट्रेलियासाठी गोलंदाजी करण्यासाठी आला आणि त्याने २२ धावा देत इंग्लंडच्या अर्ध्या संघाला पॅव्हेलियनचा रस्ता दाखवला. यासह या सलामीवीराने ऑस्ट्रेलियन क्रिकेटच्या इतिहासात प्रथमच गोलंदाज म्हणून उत्कृष्ट कामगिरी नोंदवली.

शॉर्ट ऑस्ट्रेलियाकडून ७ वा गोलंदाज म्हणून गोलंदाजी करायला आला आणि त्याने अवघ्या २२ धावांत ५ विकेट घेतले. शॉर्टने इंग्लंडचे सलामीवीर फिलिप सॉल्ट, लियाम लिव्हिंगस्टोन, जेकब बॅटॉल, सॅम कुरन आणि ब्रायडन कारसे यांना बाद केले. या ५ विकेट्ससह पुरुष क्रिकेटच्या इतिहासात संघातील ७वा गोलंदाज म्हणून ५ विकेट घेणारा तो पहिला





### ऑस्ट्रेलियाच्या मॅथ्यू शॉर्टचा गोलंदाजीत नवा विक्रम

ऑस्ट्रेलियन क्रिकेटपटू ठरला. ऑस्ट्रेलियाने इंग्लंडविरुद्धच्या दुसऱ्या टी-२० सामन्यात ७ गोलंदाजांचा वापर केला, ज्यामध्ये शॉर्ट शेवटचा गोलंदाज म्हणून गोलंदाजी करण्यासाठी आला. इतकेच नाही तर मॅथ्यू शॉर्ट पुरुषांच्या टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये ५ विकेट घेणारा पूर्ण सदस्य राष्ट्राचा पहिला सलामीवीर ठरला आहे. महत्त्वाची गोष्ट म्हणजे शॉर्टने केवळ ३ षटके टाकली आणि ५ फलंदाजांना केवळ २२ धावा देत बाद केले.

प्रथम फलंदाजी करताना जेक फ्रेझर-मॅकगर्कचे अर्धशतक आणि जोश इंग्लिशच्या ४२ धावांच्या खेळीमुळे ऑस्ट्रेलियाने २० षटकांत ६ गडी गमावून १९३ धावा केल्या. प्रत्युत्तरात लियाम लिव्हिंगस्टोनच्या झंझावाती खेळीच्या जोरावर इंग्लंडने १९ षटकांत ७ गडी गमावून १९४ धावांचे लक्ष्य गाठले. लियामने ४७ चेंडूत ५ षटकार आणि ६ चौकारांच्या मदतीने ८७ धावांची खेळी केली. याविजयासह इंग्लंड संघाने मालिकेत दमदार पुनरागमन केले आहे.

#### सॉल्टची तुफानी खेळी

२८ वर्षीय फिल सॉल्टने ऑस्ट्रेलियाविरुद्ध सलामी देताना १६९ च्या स्ट्राईक रेटने फलंदाजी करताना २३ चेंडूत ३९ धावा केल्या. या छोट्या पण आक्रमक खेळीत सॉल्टने २ चौकार आणि ३ षटकारही लगावले. याशिवाय मालिकेबद्दल बोलायचे झाले तर, इंग्लंडने दुसरी टी-२० जिंकल्यानंतर मालिका १-१ अशी बरोबरीत आहे. पाहुण्या टीम ऑस्ट्रेलियाने पहिला ढ२० २८ धावांनी जिंकला होता. आता मालिकेतील अंतिम आणि निर्णायक सामना १५ सप्टेंबर रोजी मँचेस्टरच्या ओल्ड ट्रॅफर्ड मैदानावर होणार आहे.

# प्रथम सिंहचे शानदार शतक

**बंगळुरू, दि. १४ :**

शुबमन गिलच्या संघात आलेल्या प्रथम सिंहने शानदार शतक झळकावले आहे. दुलीप ट्रॉफी २०२४ मधील तिसरा सामना भारत अ आणि भारत ड यांच्यात खेळला जात आहे. या सामन्याच्या पहिल्या दिवशी भारत ए संघाचा पहिला डाव २९० धावांवरच मर्यादित राहिला. प्रत्युत्तरात भारत ड संघ केवळ १८३ धावा करू शकला. दुसऱ्या दिवशी भारत ए संघाने दुसऱ्या डावात चांगली सुरुवात केली. सलामीवीर प्रथम सिंह आणि कर्णधार मयांक अग्रवाल यांनी संघाला चांगली सुरुवात करून दिली आणि पहिल्या विकेटसाठी ११५ धावांची भागीदारी केली. मयंक अग्रवाल अर्धशतक झळकावून बाद झाला. मयंक बाद झाल्यानंतरही प्रथम सिंह मैदानावर कायम राहिला आणि तिसऱ्या दिवसाची सुरुवात झाल्यानंतर त्याने धमाकेदार शतक झळकावले.



तिसऱ्या दिवसाचा खेळ सुरू होताच प्रथम सिंहने चौकारासह आपले शतक पूर्ण केले. प्रथम १४९ चेंडूत ११ चौकार आणि एका षटकारासह शतक पूर्ण केले. प्रथम श्रेणी क्रिकेटमधील प्रथमचे हे दुसरे शतक आहे. प्रथम सिंह दुलीप ट्रॉफी २०२४ च्या पहिल्या सामन्यात भारत ए संघाचा भाग नव्हता. स्पर्धेच्या पहिल्या सामन्यात शुभमन गिलने मयंक अग्रवालसह भारत ए संघाकडून डावाची सुरुवात केली. मात्र बांगलादेशविरुद्धच्या पहिल्या कसोटीत शुभमन गिलची निवड

### दुलीप ट्रॉफी स्पर्धा

झाल्यानंतर प्रथम सिंहचा बदली खेळाडू म्हणून संघात समावेश करण्यात आला.

शुबमन गिलच्या जागी संघात निवड झाल्याने या संधीचे सोने करत प्रथमने उत्कृष्ट कामगिरी केली. या ३२ वर्षीय फलंदाजाने दुलीप ट्रॉफी २०२४ च्या पहिल्याच सामन्यात शानदार शतक झळकावून संघाला मजबूत स्थितीत आणले. प्रथमचे दुलीप ट्रॉफीतील हे पहिले शतक आहे. त्याने १८९ चेंडूत १२२ धावांची खेळी खेळली आणि संघाची धावसंख्या २०० च्या पुढे नेली.

गेल्या रणजी मोसमात त्याने १२ डावांत तीन अर्धशतकांसह ५३० धावा केल्या होत्या. प्रथमने २०१९-२० मधील पहिल्या सत्रात सय्यद मुश्ताक अली टी-२० ट्रॉफीमध्ये सलग चार अर्धशतके नोंदवून लहान फॉरमॅटमध्येही चमकदार कामगिरी केली आहे.

# रोहन बोपण्णा टेनिस लीगमध्ये सहभागी होणार

**मुंबई, दि. १४ :**

भारतातील सर्वाधिक लोकप्रिय असलेल्या टेनिसपटूंपैकी एक असलेला रोहन बोपण्णा प्रथमच टेनिस लीगमध्ये सहभागी होणार आहे. टेनिस खेळात क्रांती घडवून आणण्याचे लीगचे प्रमुख उद्दिष्ट आहे. आतापर्यंत टेनिस प्रिमियर लीगचे पाच हंगाम यशस्वी पूर्ण झाले असून, सहाव्या पर्वाची तीव्रता वाढू लागली आहे. भारताचा ४४ वर्षीय बोपण्णाने कारकिर्दीत दोन ग्रॅण्डस्लॅम विजेतीपदे मिळविली आहेत. तीन ऑलिम्पिक स्पर्धेतही त्याने भारताचे प्रतिनिधीत्व केले आहे.

रिओ २०१६ ऑलिम्पिक स्पर्धेत त्याला चौथ्या स्थानावर समाधान मानावे लागले होते. बंगळुरुचा रहिवासी असलेल्या बोपण्णाने वर्षाच्या सुरुवातीला जानेवारी महिन्यात जागतिक क्रमवारीत अव्वल स्थान भूषविणारा सर्वात वयस्क



खेळाडू म्हणून मान मिळविला होता. कारकिर्दीत आतापर्यंत त्याने २५ हून अधिक विजेतीपदे मिळविली आहेत. टेनिस क्रमवारीत अव्वल स्थानावर पोहोचणारा बोपण्णा लिएंडर पेस, महेश भूपती, सानिया मिर्झानंतर चौथा टेनिसपटू आहे. या चारही भारतीय टेनिसपटूंनी कारकिर्दीत एकतरी ग्रॅण्डस्लॅम विजेतेपद मिळविले आहे.

जवळपास दोन दशकाहून अधिक काळ एटीपी मालिकेचा भाग असलेला बोपण्णा आणि टेनिस प्रिमियर लीगच्या नव्या शैलीत खेळताना दिसणार आहे. सर्व फ्रँचाईजी उपांत्य फेरीत पात्र होण्यासाठी प्रत्येकी पाच सामने खेळणार आहेत. लीग क्रांतिकारक अशा २५ गुणांच्या पद्धतीत खेळविली जाणार आहे. दोन फ्रँचाईजींच्या सामन्यात पुरुष एकेरी, महिला एकेरी, मिश्र दुहेरी, पुरुष दुहेरी सामन्यांचा समावेश असेल. प्रत्येक सामन्यात १००० गुण असतील. प्रत्येक श्रेणीचे मूल्य २५ गुण असेल. प्रत्येक संघाला साखळी टप्प्यात ५०० गुण (१०० गुण बाय ५ सामने) गुण कमावता येणार आहेत.

RNI No. GOAMAR/2013/49899 **दैनिक हेराल्ड** वर्ष १३, अंक १२. **मालक:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., **प्रिंटर:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशक:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशन स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल - १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा, **छपाई स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल - १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा. **एडिटर इन चीफ:** श्री. आर. एफ. फर्नांडिस, **संपादक:** श्री. दिनेश वासुदेव केळुस्कर (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी).

RNI No. GOAMAR/2013/49899 **Dainik Herald** Volume 13, Issue 12. **Owner:** Herald Publications Pvt. Ltd., **Printer:** Mr. Walter Ligorio D'Sousa, **Publisher:** Mr. Walter Ligorio D'Sousa,, **Published from:** Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa and **Printed from**: Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa. **Editor in Chief** Mr. R. F. Fernandes, **Editor :** Mr. Dinesh Vasudev Keluskar (Responsible under P.R.B. Act), .